# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक २०.०९.२००६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

बुधवार दिनांक २० सप्टेंबर २००६ रोजी मा.महापौर श्री.किशनचंद लेखराज तनवाणी यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील ‘‘प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह ‘‘येथे दुपारी १२.३५ वाजता ‘‘वंदेमातरम्‘‘ या गिताने सुरू झाली . सभेला मा.आयुक्त तसेच नगरसचिव यांचेसह संबधीत अधिकारी व खालील प्रमाणे स. सभासद उपस्थित होते.

०१. स.स.श्री.भगवान घडमोडे
०२. स.स.श्री.रेणुकादास वैद्य
०३. स.स.श्री.संतोष खेंडके पाटील
०४. स.स.श्री.अ.साजेद अ.सत्तार
०५. स.स.श्री.बम्हणे पुनमचंद सोनाजी
०६. स.स.श्री.सुरे सिताराम इसराम
०७. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०८. स.स.श्री.गवळी रविकांत काशिनाथ
०९. स.स.श्री.नाहदी नासेर महमंद याहीया
१०. स.स.श्री.दाभाडे मिलींद यशवंत
११. स.स.श्री.धिल्लन तरविंदरसिंग महेंद्रसिंग
१२. स.स.श्री.ठाकुर पुरूषोत्तम रघुविरसिंग
१३. स.स.सौ.लक्ष्मी शंकर आशन्ना
१४. स.स.श्री.जगताप संजय उत्तमराव
१५. स.स.सौ.मसरद बेगम शरफोद्दीन
१६. स.स.श्री.गायकवाड दिलीप नारायण
१७. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१८. स.स.सौ.जोशी रजनी रमेश
१९. स.स.श्री.महेश शिवाजीराव माळवतकर
२०. स.स.श्री.अत्तरदे प्रकाश सुका
२१. स.स.श्री.जैस्वाल अनिल जुगललाल
२२. स.स.श्री.सोनवणे कचरू श्रीपती
२३. स.स.सौ.इंगळे शंकुतला सांडुजी
२४. स.स.सौ.रगडे सुशिला भगवान
२५. स.स.श्रीमती शिंदे मिराबाई रामराव
२६. स.स.सौ.पाटील दिपाली सुनिल
२७. स.स.सौ.बेंद्रे विमल तुकाराम
२८. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरीभाऊ
२९. स.स.श्री.मो.जावेद मो.इसाक
३०. स.स.सौ.मिटकर शोभा हरीश्चंद्र
३१. स.स.सौ.यास्मिन बेगम अ.कदिर
३२. स.स.श्री.खान जावेद हसन कासीम हसन

३३. स.स.श्री.स.खुसरो बुऱ्हानोद्यीन
३४. स.स.श्री.अ.रशिद खान मामु
३५. स.स.सौ.लता श्रीनिवास दलाल
३६. स.स.श्री.रिडलॉन संजु सुग्रीव
३७. स.स.श्री.खान कैसर बद्रोद्दीन
३८. स.स.सौ.कुरैशी नजमा बेगम युनूस
३९. स.स.श्री.खान मुजीब मीर आलम खान
४०. स.स.श्री.खान निसार मो.खान
४१. स.स.श्री.हाजी शेरखान अ.रहेमान
४२. स.स.सौ.राऊत छाया विलास
४३. स.स.श्री.पाथ्रीकर दत्ताभाऊ अण्णासाहेब
४४. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
४५. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
४६. स.स.श्री.अमोदी अबुबकर बिन सईद
४७. स.स.श्री.जेजुरकर संतोष सुधाकरराव
४८. स.स.श्री.तुपे त्र्यबंक गणपतराव
४९. स.स.सौ.पोळ सरला सखाराम
५०. स.स.श्री.कटकटे सतीष विश्वनाथ
५१. स.स.सौ.बोरामणीकर कला सुरेश
५२. स.स.श्री.कराड भागवत किसनराव
५३. स.स.सौ.मंगला प्रकाश गायकवाड
५४. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
५५. स.स.सौ.रेखा कैलास काथार
५६. स.स.श्री.गांगे रविंद्र लक्ष्मण
५७. स.स.श्रीमती डॉ.बिनवडे आशा उत्तम
५८. स.स.श्री.खुडे विजय किसन
५९. स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
६०. स.स.श्री.शिंदे दामोधर माधवराव
६१. स.स.श्री.गांगवे बन्सीलाल तुळशीराम
६२. स.स.सौ.ससाणे सरीता अशोक
६३. स.स.श्री.वाघ भाऊसाहेब बाबुराव
६४. स.स.श्री.कावडे साहेबराव राणुबा
६५. स.स.श्री.डांगे बाबासाहेब लक्ष्मण
६६. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
६७. स.स.सौ.वाघमारे पार्वताबाई विजय
६८. स.स.सौ.संगिता विठ्ठलराव जाधव
६९. स.स.श्री.विसपुते शंशाक दामोधर
७०. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
७१. स.स.सौ.खंदारे वंदना प्रकाश
७२. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप
७३. स.स.श्री.जोशी संजय रामदास
७४. स.स.सौ.विजया किशोर रहाटकर

७५. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
७६. स.स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ
७७. स.स.श्री.शिरसाट संजय पांडुरंग
७८. स.स.सौ.जैन अल्पा विकास
७९. स.स.श्री.बारवाल गजानन
८०. स.स.सौ.मोमीन सफीया फिरदोस
८१. स.स.सौ.घोडेले अनिता नंदकुमार

**नामनिर्देशित पालिका सदस्य**

०१. स.स.श्री.केनेकर संजय किसनराव
०२. स.स.श्री.तुलशीबागवाले किशोर बाबुलाल
०३. स.स.श्री.राजेश व्यास
०४. स.स.श्री.सुरजितसिंग सबरवाल
०५. स.स.श्री.कुलकर्णी सुरेंद्र माणिकराव

**संवाद :**

डॉ. भागवत कराड : स.सदस्या सौ.सरला पोळ यांचे वडील स्व.देविदास इंगळे यांचे दु:खद निधन झालेले आहे त्यांना श्रध्दाजंली अर्पण करावी.

श्री. रेणूकादास वैद्य : यास माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :ठिक आहे सर्वांनी श्रध्दाजंलीसाठी उभे रहावे.

याचवेळी स. सदस्या सौ.सरला पोळ यांचे वडील स्व.देविदास इंगळे यांचे दु:खद निधन झाल्याबध्दल त्यांना सभागृहातर्फे २ मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.

श्री. रविकांत गवळी : या शहराला सांस्कृतिक व ऐतिहासीक असा वारसा आहे. महापालिकेच्या माध्यमातून महापौर चषक फुटबॉल स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेला राष्ट्रीय खेळाडूंनी भाग घेतलेला होता. तसेच या शहरातील नागरीकांचा उत्कृष्ठ असा प्रतिसाद मिळालेला आहे. महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी व समन्वय प्रमुख यानी हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडला त्याबध्दल मा.महापौर तसेच सर्व कर्मचाऱ्याचे अभिनंदन करण्यांत यावे.

श्री. विनायक पाडे : अत्यंत चांगली राष्ट्रीय स्तरावरची स्पर्धा झालेली आहे. संबधीत समन्वयक तसेच मा.महापौर, मा.आयुक्त व कमेटीचे तसेच सर्व अधिकारी कर्मचारी यांचे अभिनंदन करावे यास मी अनुमोदन देतो.

श्री.काशिनाथ कोकाटे : सुदैवाने गेल्या वर्षी आपण महापौर होते. उपमहापौरही तेच आहे. तसेच मा. आयुक्त ही तेच आहे. इतर पदाधिकारी बदलले आहे. विरोधी पक्ष नेता यांचेशिवाय काहीच होत नाही याची जाणीव मागिल सर्वसाधारण सभेत आम्हाला आलेली आहे. या सर्व बाबी असतांना देखिल संपूर्ण शहरामध्ये पाणी गेलेले होते. मग तो भाग विष्णूनगर असेल भानूदासनगर पासून निघालेला नाला असेल. किवा ज्योतीनगरचा नाला असेल.किराडपूराच्या एन ८ पासून निघालेला नाला शहराचा किराडपूरा व रोषणगेट परीसर पाण्याखाली व्यापलेला आहे. त्याचप्रमाणे खामनदीवर ओव्हर फ्लो होवून त्यामध्ये बिसमिल्ला कॉलनी आरेफ कॉलनी, होनाजीनगर स.सदस्यांनी सांगितले की दोन दिवस पाण्याचा वेढा पडलेला होता. अशा परीस्थितीत तेवढीच परीस्थिती नव्हे गेल्या वर्षी ज्या भागात पाऊस झाला ज्या भागात पाणी घुसले ज्या लोकांचे नुकसान झाले होते त्याच जनतेचे पून्हा पून्हा नूकसान झालेले आहे. आणि म्हणून त्याची पुनरावृत्ती पून्हा होवू नये आणि त्या पावसाच्या पाण्यामुळे त्या जनतेला त्रासाला सामोरे जावू नये म्हणून बजेट

प्रोव्हीजन करण्यात आलेली होती. परंतू चार दिवसापूर्वी जो पाऊस झाला त्यावेळी आपल्या निदर्शनास आले आहे आपण स्वत: पाहणी केलेली आहे. मा.आयुक्तानी पाहणी केली प्रत्येक लोकप्रतिनिधी यांनी आपआपल्या परीने पाहणी केली. सुकना नदीचे पाणी संपुर्ण नारेगावात गेले व त्यावेळी रात्री ११.०० वाजता जवळपास ४०० कुटूंबांना वसाहतीतून बाहेर काढण्यात आले. त्या ठिकाणी जाता येत नव्हते अशी परीस्थिती होती हे आपण प्रत्यक्ष पाहिले आहे. तसेच सिडको भागातील एन -११ नवजीवन कॉल्नी असेल, सुदर्शननगर असेल, एन -८ चा काही भाग असेल अविष्कार कॉलनी असेल. या ठिकाणी गेल्या वर्षी पाणी होते ज्या ज्या ठिकाणी संरक्षित भिंती पडल्या ज्या ज्या ठिकाणी तळमजल्यात पाणी गेले. या भागात मोठया प्रमाणात नुकसान झालेली आहे. आपण गेल्या वर्षी जर कामे केले असते तर पुन्हा त्यांची पुर्नरावृत्ती झाली नसती. प्रशासनाने कामे केली नाही म्हणून पून्हा परीस्थितीला सामोरे जावे लागले. स.सदस्य श्री.विसपूते यांनी एक नाल्यासाठी बजेट ठेवलेले आहे. यांचे वार्डातून एक नाला जातो ते अनधिकृत भाग आहे की कसा आहे हा नंतरचा प्रश्न आहे. नागरीकाचे जीवन व त्यांना जीवनावश्यक वस्तू पुरविणे हे महापालिकेचे कर्तव्य आहे. यासाठी बजेटमध्ये तरतूद केलेली आहे वार्ड इजिनिअर मूळे तेथे काम केलेले नाही ही बाब आपल्या निदर्शनास आणून देवू इच्छितो. आजपर्यत अंदाजपत्रक तयार नाही, कशासाठी वेळ लागलेला आहे.नाल्याच्या कडेला जे काही घरे आहे त्याचा सर्वे प्रशासनाने केलेला होता. त्या संदर्भात प्रशासनाने सर्वसाधारण सभेत ठराव मांडला त्या ठरावामध्ये असे म्हटले होते की या वर्षी त्या लोकांना पर्यायी जागा देण्याचा प्रस्ताव होता. त्यावर सभागृहात चर्चा झाली व असे केले तर लोकप्रतिनिधी यांना कसा त्रास होईल याचा सभागृहाने विचार केला आणि पून्हा सुधारीत प्रस्ताव मागवून या सभागृहाने त्यास मंजूरी दिली. परंतू त्याची कार्यवाही शुन्य झालेली आहे. त्यामूळे पुन्हा आरेफ कॉलनीतील २०० ते २५० घरे पून्हा पाण्यात गेली. ते बरोबर की चूक हे नंतर होईल जीवीत हानी झाल्यानंतर कुणाला नुकसान भरपाई देणार गेलेला जीव परत येणार नाही. अनधिकृत घरानांच नाही तर अधिकृत घरांना सूध्दा त्रास होत आहे. आज बघीतले तर आंबेडकरनगर पासून शिवनेरी कॉलनी एन -९ एच प्रतापनगर रायगड नगर श्रीकृष्णनगर उद्यान पासून पोलीस मेस पर्यत व कटकटगेट पर्यत जो नाला वाहतो त्यात संपूर्ण ड्रेनेजचे पाणी वाहते आहे. त्या ड्रेनेजच्या बाजूला सर्व अधिकृत वसाहत आहे अनाधिकृत नाही. लाखो रूपये देवून लोकांनी प्लॉट घेतलेले आहे. त्यांना तेथे राहणे मुश्कील झालेले आहे . चिकुन गुनिया सारखा भयानक रोग तेथे फैलावत आहे. या कडे प्रशासनाचे संपूर्ण दुर्लक्ष आहे. म्हणून विनंती करतो की जर बजेट मध्ये प्रोव्हिजन केलेली असेल त्या वार्डाच्या नगरसेवकांनी आपल्या निदर्शनास आणून दिले असेल गेल्या वर्षी ज्या ज्या भागात आपण पाहणी केली होती जेथे नुकसान झाले होते त्या त्या भागात किती कामे झालेली आहे त्याची माहिती प्रत्येक विभागाकडून घेवून चर्चा करावी अशी विनंती करतो.

श्री.अ.रशिद खान : नारेगाव असेल.कटकटगेट असेल आरेफ कॉलनी असेल अनेक भागातील लोक पावसाच्या पाण्याने त्रास आहे. नाल्यातील कचरा उचलला जात नाही. घाण काढली जात नाही. सरंक्षित भिंतीचे प्रोव्हिजन असतांना सूध्दा कामे केली जात नाही. नगरसेवकांना उपोषणास बसावे लागते. दुर्दैवाची बाब आहे. लोकांनी अनधिकृत प्लॉट घेतले घरे केली. त्याकडे लक्ष न देता गरीबाचे जीव वाचवाचे

एखादया ठिकाणी अशा भागात परीस्थिती असेल परंतू काही भाग अधिकृत असूनही पावसाचे पाणी लोकांच्या घरात गेलेले आहे. शासनाकडून जे अनुदान आले त्यातून संरक्षित भिंतीसाठी काही बजेट ठेवावे. काम करण्यात यावे. डाक कार्यालयाजवळ मस्जीद, मंदीर तसेच अनेक लोकांच्या घरात सूध्दा पाणी गेले. जर अशा ठिकाणी पाणी जात असेल व प्रशासन कार्यवाही करीत नसेल तर तर योग्य नाही. यासाठी पर्यायी व्यवस्था करावी. नसता गरीब लोक रस्त्यावर येतील.

मा. महापौर : रस्त्याच्या कामासाठी मराठवाडा पॅकेज मध्ये २५ कोटी आलेले होते. यातून कामे कूठे करायची हे पालकमंत्री यांनी प्रोव्हिजन करून दिल्यानूसार कामे होतील. महापालिकेला अधिकार नव्हते. तातडीचे काम असेल तर महानगरपालिकेच्या इतर काही हेड बदलून त्यातून खर्च करता येतील.

श्री. सय्यद खुसरो : नारळीबाग नूरकॉलनी भागातील मस्जीदमध्ये पावसाचे पाणी गेले. मा. आयुक्त यांनी प्रत्यक्ष भेटही दिली होती.बजेट मध्ये ड्रेनेजचे काम करण्यासाठी तरतूद असतांना काम केले नाही. घाण पाणी मंदीर मस्जीदमध्ये जात आहे. नागरीक सहन करणार नाही. गटारीचे बांधकामासाठी तरतूद होती तेही काम केले नाही. काही अनुचीत प्रकार घडल्यास प्रशासनाची जबाबदारी राहील.

याच वेळी मा. महापौर डायस समोर अनेक सदस्य एकत्र जमा होतात मोठमोठयाने बोलतात काहीही ऐकू येत नाही.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : सभा तहकूब करावी.

श्री.संतोष खेंडके : सर्व कार्य.अभियंता यांचेकडून खूलासा घ्यावा. सर्वच वार्डात पावसामूळे वाईट परीस्थिती निर्माण झालेली आहे. अनेक लोकांच्या घरात पाणी गेलेले आहे.

डॉ. भागवत कराड :सभा तहकूब करून प्रश्न सूटणार नाही. सर्व सदस्यांचे मत ऐकून ध्यावे त्यानंतर योग्य ते आदेश प्रशासनास दयावे.

श्री. कैलास गायकवाड :सर्व सदस्यांचे प्रश्न ऐकूण घ्यावे व त्या बाबतीत निर्णय घेण्यात यावा.

मा. महापौर : सर्वांनी आपआपल्या जागेवर बसावे. एका वेळी एकाच सदस्यांनी बोलावे.

याच वेळी सर्व सदस्य आपआपल्या जागेवर जावून बसतात.

मा. महापौर : स. सदस्य श्री. खुसरो यांचे वार्डात मी स्वत: व मा. आयुक्त यांनी भेट दिलेली होती किती दिवसात काम होईल या बाबत मा. आयुक्त यांनी खूलासा करावा.

मा. आयुक्त : स.सदस्य श्री. खुसरो यांचे वार्डात मी स्वत: व मा. महापौर आम्ही पाहणी केली होती. पूर्वी जी पाणी जाण्याची नाल्याची कॅपीसिटी होती नाला बांधल्यावर पाणी वाहण्याची कॅपीसीटी कमी झाली. ज्या पध्दतीने तो बाधंलेला आहे वरच्या बाजूने स्लॅब पण टाकलेला आहे. पाणी जास्त झाल्यानंतर जे होल ठेवलेले आहे त्यातून पाणी बाहेर निघून इतर बाजूच्या भागात पाणी जाते. जेंव्हा जेंव्हा जास्त पाऊस येईल तेंव्हा तेंव्हा त्या नाल्यातून पाणी बाहेर पडणार ही वस्तूस्थिती आहे. नाल्यावरील स्लॅब काढावे लागेल व उंची घेवून नाल्याचे रूंदी वाढवावी लागेल. जोपर्यत पाणी वाहून देण्याची कॅपीसीटी वाढवित नाही तोपर्यत कोणतेही मार्ग निघणार नाही. आज अशी परीस्थिती आहे. शहराच्या वरच्या भागात दोन मोठी धरणे आहे. ती भरलेली असून जास्तीचा पाऊस झाल्यानंतर जे पाणी येते ते या शहरातीलच नाल्यातून वाहून जाते. यापूर्वी धरण भरत नव्हते जो पाऊस पडत होतो तो धरणामध्येच ते पाणी साठले जात होते. व नाल्याच्या आसपासच्या परीसरातीलच पाणी नाल्यात येत होते.त्यामूळे ओव्हरफ्लो होवून पाणी बाहेरून वाहत नव्हते. शहरातील जे पाच सहा मोठे नाले आहे त्याचे पात्र व खामनदीचे पात्र रूंद करण्यासाठी बाजूचे काही घरे काढावी लागतील त्याशिवाय दुसरा पर्याय

नाही.ज्यामूळे पात्र अरूंद झालेले आहे ते कारण दूर करावे लागेल. फारशा घरामध्ये पाणी गेलेले आहे. ही वस्तुस्थिती आहे.

श्री. मुजीब खान : अनेक वेळा प्रशासनाकडे मी पत्र दिले की नाल्यावर अतिक्रमण होत आहे. अतिक्रमण झाल्यामूळे नाल्याचे पात्र अरूंद झालेले आहे. सिटी. सर्वे ऑफिसमधये नाल्याची जागा किती आहे. याची माहिती मिळेल.या सभागृहात अनेक वेळा चर्चा होवूनही अतिक्रमण थांबले नाही. नाल्याच्या बाजूला लोकांनी अतिक्रमण केले म्हणून नाला अरूंद झाला.पोलीस कॉलणीपासून ते एस.टी कॉलनी मार्गे जो नाला येतो त्या नाल्याचे तीन वेळेस नाला ट्रेडिंग केले.मा. सौ. मिरा बोरवणकर, पोलीस अधिक्षक,असतांना त्या नाल्याचे मेजरमेंन्ट केले होते.नाला ट्रेडींग केले होते त्यानंतरही त्या नाल्यावर एका व्यक्तीने २०×१०० प्लॉट करून नाला पूढे करून मागे जागा तयार करीत आहे.जे काम होत आहे ते ३०० फुट मागे सोडून काम होत आहे. त्या संबधी मी प्रशासनाकडे पत्र दिले अदयाप कार्यवाही केलेली नाही. नाल्याची रूंदी किती आहे याची नकाशावर सर्व माहिती मिळू शकेल. नाला ट्रेनिंग साठी मान्यता दिली त्या बाजूलाच मकसूद कॉलनी मध्ये नाल्याच्या कडेला एक मोठी इमारती आहे. ती हालते आहे असे असतांना तेथे लोक राहतात संबधीत अधिकारी यांना माहिती दिली असतांना कार्यवाही केली नाही. अतिक्रमण विभाग याकडे दुर्लक्ष करीत आहे.

श्री.अ.रशिद खान : १२ वर्षापूर्वी तसेच दोन वर्षापूवीही पत्र दिले होते. की नाल्यातील अतिक्रमण हटवावे जेणे करून ही परीस्थिती निर्माण होणार होती. परंतू कार्यवाही केलेली नाही. नाल्याची सिमा किती आहे यासाठी मोजणी करावी. सि.टी सर्वे कार्यालयास संपूर्ण रेकॉर्ड आहेत.जर या नाल्यामूळे शहरातील नागरीकांना झळ पोहचत असेल व महानगरपालिका बदनाम होत असेल तर झालेले अतिक्रमण काढण्याची कार्यवाही करावी व नाला रूंद करावा.

मा.महापौर : कार्य. अभियंता यांनी खूलासा करावा.

कार्य. अभियंता(ड्रेने.) : स. सदस्य श्री. खुसरो यांचे वार्डात दोन कामे होती त्यात एक गटार बांधकाम तसेच एक ड्रेनेजचे अंदाजपत्रक आहे. हे टेंडर साठी पाठविलेले आहे. तसेच गटार बांधकामाचे एक लक्षचे अंदाजपत्रक माझ्याकडून पूढील कार्यवाहीसाठी गेलेले आहे माझ्यास्तरावर कोणतेही काम प्रलंबीत नाही.

श्री. सय्यद खूसरो : चूकीची माहिती देत आहे. टेडंरसाठी गेलेले नाही. त्यांचेकडेच प्रलंबीत आहे.

मा. महापौर : स. सदस्य श्री. खुसरो यांचे वार्डातील ड्रेनेजचे काम हे टेंडरसाठी गेलेले आहे इतर ठिकाणचे कामे ही तीन चार दिवसात टेंडरसाठी पाठविण्याची कार्यवाही करावी.स.सदस्य श्री. मुजीब खान यांनी विचारलेल्या प्रश्नाचा खूलासा करावा. अगोदर जेथून रिटेनींग वॉल केले होते तेथून न करता कमी करण्यात आलेली आहे असे त्याचे म्हणणे आहे हे सत्य आहे का ?

कार्य. अभियंता(ड्रेनेज.): नाल्याची सिमेबाबत या विभागाकडे माहिती नाही. माझ्याकडून तसे काही झालेले नाही.

श्री. मुजीब खान :प्रशासनाचे अधिकारी यांचे काम करण्याची पध्दतच वेगळी आहे. एक अदांजपत्रक तयार करतात दुसऱ्या अधिकाऱ्याकडे पाठविले जाते त्यांचेकडून तिसऱ्या अधिकाऱ्याकडे पाठविले जाते. मकसुद कॉलनीची एक संचिका सहा महिण्यापासून मा. आयुक्तांनी मंजूरी दिल्यानंतरही सहा महिनेपासून लेखा विभागात संचिका का थांबविली जाते. रविंद्रनगर ते जिल्हाधिकारी कार्यालय पर्यतचे काम सुरू होणार

होत टेंडर कॉल केले अदयाप काम सूरू केलेले नाही. ६-६ महीने काम करण्यास निष्काळजीपणा होते. याची काय कारणे आहेत.

श्री. विनायक पांडे : गेल्या दीड वर्षापासून पूर परीस्थितीची कल्पना प्रशासनास देत आहे. अनेक वेळा स्थायी समिती सर्वसाधारण सभेत यावर चर्चा झालेली आहे. परवाच्या दिवशी हर्सूल तलाव भरून खाम नदीला मोठे पाणी आहे होते पूर परीस्थिती निर्माण झाली होती. बेगमपूरा स्मशानभूमी व काही भाग अलहिलाल कॉलनी व इतर भागात पावसाचे पाणी होते हजारो लोक पूरामध्ये अडकले. महानगरपालिकेचे अधिकारी तेथे उपस्थित होते. ही परीस्थिती महानगरपालिकेचे स्वत: हून निर्माण केलेली आहे. ज्यांनी अतिक्रमण केलेले आहे त्यांना हटविण्यासाठी प्रशासनाने कोणतीही उपाययोजना केलेली नाही.जी सिवरेज लाईन टाकलेली आहे ती पूर्णपणे वाहून गेलेली आहे या ड्रेनेजचे पाणी ज्ञानेश्वर विदयालयाच्या जागेत जमा होते. चिकुन गुनियाचे सर्वात जास्त पेशंन्ट माझ्या वार्डात आहे. दुसरी सिवरेज लाईन ही विदयापिठाकडील नाल्यातून येते ती लाईन फुटलेली असून पूर्णपणे पाणी हे विहीमध्ये झिरपते. विदयापिठातील विभाग प्रमुख श्री. सुरासे यांनी माझ्याकडे अनेक वेळा या बध्दल पत्र दिलेले आहे. ते काम होईल उशीर झाल्यास वार्डात रोगराई पसरेल यासाठी ताबडतोब उपाययोजना करावयास पाहिजे.

श्री. महेश माळवतकर : १२ तारखेला मोठा पाऊस झाला मा. आयुक्तांनी चार पाच ठिकाणी व्हिजीट दिल्या जेथून पाणी जात नव्हते. त्यात त्यांनी सिडको भागात का भेट दिली नाही. सिडको हस्तांतरण होवून सहा महिने झाले. कोणतेही काम केलेले नाही. हडको भागात पोलीस कॉलनी समोरील किर्ती मंगल कार्यालयाजवळील नाल्यातून एन ११ एन ९ एन-७ जाधववाडी या भागातून येणारे सर्व पाणी येते. तेथून ते पाणी शहरात येते. थोडासा पाऊस झाला तरी त्या नाल्यास मोठे पाणी येते व श्रीकृष्णनगर भागातील घरामध्ये पावसाचे पाणी वाहत जाते. यामूळे नाला चोकअप होण्याचे प्रमाण वाढलेले आहे. त्या नाल्याची रूंदी वाढविण्शयाची गरज आहे. व सफाई नुसती वरवर होते. मे महिण्याच्या शेवटी नाल्याची सफाई केली जाते त्यावेळी पाण्याचे प्रमाण कमी असते. फरशी मैदान पासून तसेच एन -९ एच सेक्टर श्रीकृष्णनगर ते किर्ती मंगल कार्यालया पर्यत नाल्याची सफाई झाली पाहिजे गाळ तसेच तेथील बाजूला असेली लहान लहान झाडी तोडली पाहिजे. गेल्या चार पाच दिवसात मोठा पाऊस झाला तेथे एका अधिकाऱ्यांनी पाहणी केली नाही. थोडा पाऊस आला तरी किती मंगल कार्यालयाजवळ पूलाच्या वर रस्त्यावर पाणी आले होते. लोकांच्या घरात पाणी गेलेले आहे तो नाला रूंद करण्याची गरज आहे. थोडेसे पावसामूळे अधिकृत घरामधे पाणी जाते तर मोठा पाऊस आल्यानंतर अनेक घरात पाणी जाण्याची शक्यता आहे त्यासाठी नाला रूंद करावा तसेच सरंक्षित भिंत बाधण्यात यावी. हस्तातरण हे कागदावरच केले का तो शहराचा भाग येत नाही का ?तो नाला रूंद करण्याची गरज आहे.

श्री.अ.रशिद खान :नाल्याच्या कडेला लोकांनी घरे करून खोटे पी. आर. कार्ड तयार करून घेतलेले आहे. त्या संबधी ही चौकशी करावी व ते अतिक्रमण काढण्यात यावे.

मा. महापौर : शहरात जे नाले आहेत ते अरूंद होत आहे प्रशासन सूध्दा कबूल करीत आहे. या बाबतीत अतिक्रमण विभाग सक्षम व्हावा म्हणून एक ठरावही घेतलेला आहे. पावसाळयात अतिक्रमण काढता येत नाही शासनाचा जी.आर आहे. त्यामूळे ५ ऑक्टोबरच्या नंतर पावसाळा संपल्यानंतर जे ही अतिक्रमण झालेले असेल व

अनधिकृत बांधकाम असेल ते प्रशासनाने पाडण्याची कार्यवाही करावी. तसेच पून्हा अतिक्रमण होणार नाही याची प्रशासनाने दखल घ्यावी.

सौ.लता दलाल : स. सदस्य व माजी महापौर श्री. अ. रशिद खान यांनी जो मूद्या मांडला त्यासी मी सहमत आहे. ज्यांनी खोटे पी.आर. कार्ड तयार करून घेतले असेल त्याची चौकशी करून कार्यवाही करावी.

श्री. रविकांत गवळी :`. प्रशासनाने सूध्दा मान्य केले की नाला अरूंद झाला आहे.नाल्याची रूंदी वाढविण्यासाठी प्रशासनाने काय कार्यवाही केलेली आहे.

सौ. रजनी जोशी : १ एप्रिल पासून सिडकोचे महानगरपालिकेकडे मोठया कुशलतेने मा. आयुक्त यांनी हस्तांतरण करून घेतले. हस्तांतरण केले म्हणून २५ कोटी शासनाकडून मिळाले व सिडकोकडून १५ कोटी मिळाले.पूर्वी सिडकोकडे होते महानगरपालिकेला काम करता येत नाही नागरीक ऐकूण घेत होते परंतू आता महानगरपालिकेकडे हस्तांतरण झाले. एन-९ एच सेक्टर भागात चार गल्ल्यामध्ये घरात सूध्दा नाल्याचे पाणी होते. माझ्या वार्डातही एन -११ डी आणी के सेक्टर मध्ये ४० घरामध्ये पाणी होते. तसेच नारेगाव व मसनतपूर या भागातही पूराचे पाणी गेले आहे. आपण तेथे प्रत्यक्ष भेटही दिली आहे. कमी जास्त पाऊस येवू शकतो. रस्ते व्यवस्थित राहिलेले नाही. लोकांच्या घरात पाणी जाणार नाही तसेच रस्त्याची कामे व इतर कामे करण्यासाठी प्रशासन काय उपाययोजना करणार आहे.

मा. आयुक्त : स.सदस्य श्री.रविकांत गवळी यांनी म्हटल्या प्रमाणे त्या भागात पाहणी केली होती त्यावेही सबंधीत नगरसेवकही होते. त्या ठिकाणी आताच नियोजन करणे शक्य आहे. सर्व अतिक्रमण काढल्यानगर जे दोन नाले एकत्र होतात व पाणी खामनदीमध्ये येते. त्या नाल्याचा सर्वे करून तो कूठे खोल करावयास पाहिजे. जास्तीचे पाणी वाहून नेण्याची कॅपीसिटी वाढवावयास पाहिजे या बाबत सर्वे करून यासाठी कोणत्यातरी हेडमधून २ लक्ष रूपये वळती करून दयावे जेणे करून सर्वेचे काम करावयास पाहिजे. येत्या वर्षात सर्वेचे काम पूर्ण होईल, त्यामूळे पूढील उपाययोजना करता येतील.

श्री. दत्ताभाऊ पाथ्रीकर : सिडको भागाचे महानगरपालिकेकडे हस्तातरण झाल्यानंतर सिडको हडको भागात प्रत्येक वार्डात १० लक्षचे कोणकोणती कामे करायची म्हणून स. सदस्याकडून तसे पत्र घेतले अदयाप त्या कामांना सुरूवात केलेली नाही.पूर्वी जे अतिक्रमण झाले ते झाले परंतू आता सध्या अतिक्रमण मोठया प्रमाणात चालू असून नदीतील वाळूचा उपसा मोठया प्रमाणात होत आहे. अंदाजपत्रक तयार होवूनही सहा सहा महिने काम होत नसेल तर एवढा वेळ कशासाठी लागतो.

श्री. रविकांत गवळी :नाल्याचा सर्वेसाठी २ लक्षची तरतूद वळती करून दयावी म्हणून मा. आयुक्तांनी म्हटले आहे. खामनदीमध्ये लोकांनी अतिक्रमण केल्यामूळे पाणी थांबते व लोकांच्या घरात पावसाचे पाणी जाते. मा. आयुक्त तसेच पदाधिकारी यांनी पाहणी केली. नाल्याचे सिमांकन करण्यासाठी भूमि अभिलेख विभागाकडे एक वर्षापूर्वी पत्र दिलेले आहे.अद्याप कार्यवाही झालेली

नाही. या बाबतीत मा. आयुक्तांनीस्वत: दखल घेवून ताबडतोब सिमाकंन करून अतिक्रमण काढण्याची कार्यवाही करावी. काही लोकांनी मनपाच्या जागेवर प्लॉटींग करून घरे केलेली आहे. जी तरतूद करायची मा. आयुक्तांनी म्हटले त्याची अमलबजावणी ताबडतोब करावी.

(याच वेळी मा.उपमहापौर पीठासीन अधिकारी म्हणून आसनगृहण करतात.)

श्री. सतीष कटकटे : जेथे नदी नाला नाही अशा ठिकाणी शहरातील अजबनगर भागात सध्या रस्त्यावर पाणी तुंबलेले आहे . काही लोकांच्या घरात रस्त्यावरील पाणी गेलेले आहे. बजेट मध्ये तरतूद असतांना कामे करण्यात आलेली नाही.

श्री. काशिनाथ कोकाटे : सर्व सदस्यांचे हेच म्हणणे आहे की गेल्या वर्षी जी पूर परीस्थिती निर्माण झाली होती व त्यासाठी जी कामे करावयाची होती तरतूद केलेली असतांनाही अदयापपर्यंत का कामे झालेली नाही गेल्या वर्षीचीच पुर्नरावृत्ती कशामूळे झालेली आहे. याचा खूलासा होणे आवश्यक आहे. नारेगाव भागात मोठे पाण्याने नूकसान झालेले आहे. जिल्हाधिकारी यांना जाऊन सांगितले व पंचनामे करण्यात आले. मूळ प्रश्न सुटावा, त्याशिवाय अर्थ राहणार नाही.

सौ. विजया रहाटकर : ज्योतीनगर भागात दोन मोठे नाले वाहतात. एक दशमेशनगर कडून येणारा तसेच दुसरा प्रतापनगरचा नाला या दोन्ही नाल्याला मोठया प्रमाणात पाणी येते. रोजच पाणी येत आहे. प्रतापनगरच्या नालेची खोली कमी असल्यामूळे थोडा जरी पाऊस आला तरी तो भरून वाहतो. त्यामूळे आजबाजूच्या घरामध्ये पाणी जाते. त्या ठिकाणी नाल्याची सिमाकंन निश्चित कूठपासून आहे हे कळायला मार्ग नाही. मा.आयुक्त यांनी पाहणी करून काही काम करण्या बाबत सूचनाही केलेल्या होत्या परंतू रात्री बेरात्री पाऊस येतो व ये-जा करण्यासाठी लोकांना एकच रस्ता असल्यामूळे तेथून पाणी असले तरी लोकजाण्याचाप्रयत्न करतात व अनेकजण त्या नाल्यातून वाहून गेले आहे. आहे. काहींची वाहने वाहून गेलेली आहे. नाला ओलाडून जावू नका म्हणून सांगण्यासाठी नगरसेवकांना तेथे कुणासतरी उभे करावे लागते. करीता त्वरीत त्या नाल्याची सिमाकंन निश्चित करून येथे रेलींग ताबडतोब करण्यात यावे.दसमेशनगरचा नाला अतिशय लहान झालेला आहे त्या नाल्या काठ अनेक अतिक्रमण झालेली आहे. अनेक बांधकामे केलेली आहे त्याची चौकशी होणे आवश्यक आहे. नाल्यात घाण साठवून नाला चोकअप झाला लोकांच्या घरात पाणी गेले होते. तेथील ढापे काढण्या बाबत कार्यवाही करावी जेणे करून पाणी अडणार नाही. तसेच शहरात अनेक रस्त्यावर एक ते दीड फुटाचे खड्डे पडलेले आहे याची दुरूस्ती ताबडतोब करण्याची कार्यवाही करावी.

श्री.मोहन मेघावाले : मागिल बैठकीच्या दिवशी मोठा पाऊस झाल्यामूळे माझ्या वार्डातील शॉपींग सेंन्टर मध्ये दोन ते तीन फुट पाणी होते.तेथे प्रशासनाने दुर्लक्ष केले आहे.कालच्या पावसामूळे पून्हा त्या लोकांचे दुकानातील सामानाचे नुकसान झालेले आहे. तसेच एन-१२ एच सेक्टर मध्ये नालीतील पावसाचे पाणी व ड्रेनेजचे पाणी एकत्र होवून २५-३० लोकांच्या घरात क्चिन पर्यत पाणी गेले.यासाठी उपाययोजना करण्यात यावी.तसेच डासाचे प्रमाण वाढलेले असून फॉगिंग मशीनने अदयापपर्यंत वार्डात फवारणी केलेली नाही.

श्री. रविंद्र गांगे : बालाजीनगर उत्तमनगर भागात नाल्याचे पाणी लोकांच्या घरात जाते. कालच एका नागरीकांचे घर पडून तेथील नागरीक जखमी झालेला आहे. मागिल वर्षी त्या नाल्याला संरक्षित भिंत साठी तरतूद केलेली होती अदयाप काम केलेले नाही.

(याच वेळी पून्हा मा. महापौर हे आसनग्रहन करतात.)

श्री. रविकांत गवळी : ४०० वर्षापूर्वीचा इतिहास आहे. हे शहर खाम नदीच्या तिरावर बसलेले आहे. त्या नदीकाठच्या लोकांचा जीवन मरणाचा प्रश्न निर्माण झालेला आहे. जाण्यायेण्यासाठी अडचण झालेली नाही. प्रशासन योग्य प्रकारे काम करीत नाही. आपण स्वत: या भागात पाहणी करावी. तो पर्यत आजची सभा स्थगित करावी.

श्री. संजय जोशी : नाल्याची रूंदी कमी झाल्यामूळे शहरात घाण पाणी पाझरत आहे. ज्या भागात नाल्याच्या बाजूला अतिक्रमण झालेली आहे. त्यासाठी स्थळपाहणी करावी.

सौ. संगिता जाधव : पुंडलिकनगर भागात विकास काम सूरू झाले असतांना पून्हा बंद का पडलेले आहे याचा खूलासा करावा.

श्री. संतोष खेंडके : शहरात अनेक नाल्यावर अतिक्रमण झालेले आहे. सभा तहकूब करून स्थळपाहणी करावी.

मा. महापौर : सभा तहकूब करण्यात येते व ज्यांना कूणाला स्थळपाहणी साठी यायचे असेल त्यांनी यावे.

या बरोबरच आजची सभा तहकूब केल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद.